**एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविका व अंगणवाडी मदतनीस या मानधनी कर्मचाऱ्यांना सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी "भाऊबीज भेट" रक्कम मंजूर करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः एबावि-२०२६/प्र.क्र.१४५/का.६** (e-१८३९४४२)
नवीन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १४ ऑक्टोबर,२०२६

<u>वाचा</u> :- १) महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय,क्र.एबावि-२०१७/प्र.क्र.१०३/का.६, दिनांक २३ फेब्रुवारी २०१८
२) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, नवी मुंबई यांचे पत्र क्र. एबाविसेयो/अं.वाडी-भाऊबीज भेट/२०२६-२७/३८१२, दिनांक ०४.०९.२०२६.

**प्रस्तावना:-**

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत अंगणवाडी सेविका व मदतनीस या मानधनी कर्मचाऱ्यांना सन २०२६-२७ या आर्थिक वर्षातील भाऊबीज भेट प्रत्येकी रु.२,०००/ प्रमाणे अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

एकात्मिक बाल विकास सेवा योजना या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत अंगणवाडी सेविका व मदतनीस या मानधनी कर्मचा-यांना सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात प्रत्येकी रु.२,०००/- प्रमाणे भाऊबीज भेट रक्कम देण्यास शासन मंजूरी देत आहे.

२. एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत कार्यरत असलेल्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना भाऊबीज भेट अदा करण्याकरिता आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून यासाठी होणारा खर्च भागविण्यासाठी मागणी क्रमांक :- एक्स-१, २२३६, पोषण आहार, (०८) (०६) एकात्मिक बाल विकास सेवा योजना, (भाऊबीज भेट) (अतिरिक्त राज्य हिस्सा १००%) (२२३६१९५४), ३१ सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशीर्षाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात मंजूर केलेल्या तरतुदीमधुन आयुक्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना यांनी संदर्भाधीन क्र.०२ येथील पत्रान्वये केलेल्या मागणीनुसार रुपये ४२.८१९४ कोटी (अक्षरी रुपये बेचाळीस कोटी एक्याऐंशी लाख चौऱ्यान्नव हजार फक्त) इतका निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

३. आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना भाऊबीज भेट तात्काळ अदा होण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करावी.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाने अनौपचारीक संदर्भ क्र. २६१/व्यय-६, दिनांक १६.०९.२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६१०१४१४३११२४१३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VILAS
RAMDAS
THAKUR

Digitally signed by VILAS RAMDAS THAKUR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT, 2.5.4.20=cb156fb408217396128e8dcaeed3f6fa70d9fd209eb9efc83bdd68b308614534, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C8B1E52C5C4F922AB6EB7A0B44101C838AEA34F29FBFF0AEBE9D85C3DE3468C2, cn=VILAS RAMDAS THAKUR
Date: 2026.10.14 15:40:08 +05'30'

(वि. रा. ठाकूर)
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा. उपमुख्यमंत्री(गृहनिर्माण) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उपमुख्यमंत्री (उत्पादन शुल्क) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.मंत्री / राज्यमंत्री (महिला व बाल विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
६) सचिव, महिला व बाल विकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
७) आयुक्त, एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई
८) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
९) सर्व विभागीय उप आयुक्त, महिला व बाल विकास विभाग
१०) सर्व जिल्हा कार्यक्रम अधिकारी, (महिला व बाल विकास), जिल्हा परिषद
११) सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण/नागरी/आदिवासी प्रकल्प)
१२) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर
१३) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व परिक्षा), मुंबई /नागपूर
१४) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१५) कक्ष अधिकारी (का.४) महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
१६) निवड नस्ती (कार्यासन ६)